शाळेचे नांव :- मा. फु. शिक्षणशास्त्र महाविद्यालय
विद्यार्थी शिक्षिकेचे नाव - महाजन जयश्री राजेंद्र
विषय - EPC - 4
रोल नं. - २९
वर्ष - 2021 - 22

Voyager
Office File

Classic Gold
Collection

महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक विकास मंडळ संचालित

# महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय चाळीसगाव (जळगाव)

## प्रथम वर्ष २०२१-२२

विषय :- EPC - 4
Environmental Studies

प्रात्यक्षिकाचे नांव :- Visit to forest and prepare the document on environmental assets.

विद्यार्थ्याचे नांव :- Jayashri Rajendra Mahajan

रोल नं. :- 29

मार्गदर्शक प्राध्यापकाचे नांव :- प्रा. लता परदेशी मॅडम

Cpardeshi


47/50

# अनुक्रमणिका


| अ.क्र | अहवाल मुद्दे | पेज.क्र |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | |
| २) | क्षेत्रभेटीचे उद्दिष्ट्ये | |
| ३) | स्थान व नकाशा | |
| ४) | नियोजन | |
| ५) | अंमलबजावणी | |
| | प्राकृतिक वैशिष्ट्ये - a) नदी | |
| | १) स्थान व उगम २) नदीची वैशिष्ट्ये- ३) धबधबा | |
| | b) वनस्पती सृष्टी - प्रकार, वैशिष्ट्ये | |
| | c) पुरातन वस्तु — | |
| | d) हवामान | |
| | e) मृदा | |
| | f) प्राणीसंपदा | |
| | g) पर्यटन क्षेत्र म्हणून महत्त्व तसेच प्रश्नावली व | |
| ६) | पर्यावरणीय समस्या व त्यावरील उपाययोजना | |
| ७) | भेटीच्या उद्दिष्टांची फलनिष्पत्ती | |
| ८) | क्षेत्रभेटीचे शैक्षणिक ~~उपयोजन~~। उपयोजन | |


FOR EDUCATIONAL USE

| | | |
|---|---|---|
| 9) | अहवाल लेखन व फोटो | |
| 10) | समारोप | |
| 11) | प्रमाणपत्र | |



FOR EDUCATIONAL USE

# • प्रस्तावना •

" विद्यार्थी मित्रांनो "

"एखाद्या क्षेत्राला भेट देऊन तेथील नैस-र्गिक सौंदर्याचे निरिक्षण करणे हा अतिशय चांगला अनु-भव आहे. उत्कृष्ट शिक्षक होण्यासाठी अध्यापन पद्ध-तींचा वापर करावा लागतो तसेच विद्यार्थ्यांना वर्गात खेळवून ठेवण्यासाठी शिक्षकाने अध्यापन हे प्रभावी असेल पाहिजे क्षेत्रभेटीत निरिक्षणाद्वारे मिळण्याचे शास्त्र आहे आपल्या परिस्थितील प्राकृतिक आणि आर्थिक घटकांची मुळ अथवा प्राथमिक माहिती मिळविण्यास तसेच क्षेत्रभेटी च्या अभ्यास ही एक चांगली संधी चालून आलेली आहे. तसेच क्षेत्रभेटीतुन मानव व पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंध जाणुन घेण्यास मदत होते. आपल्याला कोणत्याही क्षेत्र अभ्यासाला जाण्यापूर्वी त्याचे वर्णन नियोजन करणे आवश्यक असते नियोजन करतांना प्रथम क्षेत्रभेटीचे ठिकाण नक्की करावे. आपल्या शहराच्या ठिकाणानुसा क्षेत्र भेटीसाठी वेगवेगळ्या ठिकाणांची निवड करणे शक्य असते किती उपयुक्त पद्धत आहे सांगि-तले आहे.

# ★ क्षेत्रभेटीचे उद्दिष्टे

आम्ही क्षेत्रभेट देण्यासाठी काही महत्त्वाची उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवली ती पुढीलप्रमाणे :-

१) नदीच्या उगमान्चे क्षेत्र पाहणे.

२) हेमाडपंथी मंदिराचा इतिहास जाणून घेणे.

३) जंगलात वेगवेगळे प्राणी आढळून येतात ते पाहणे.

४) पाटणादेवीच्या डोंगर रांगाची संपूर्ण माहिती जाणून घेणे.

५) तेथील मातीचे प्रकार व वैशिष्ट्ये जाणून घेणे.

६) पर्यावरणीय समस्या व त्यावरील उपाययोजना जाणून घेणे.


७) किल्ल्यांची माहिती जाणून घेणे.

८) पाटणा देवीला असलेल्या धबधब्यांची माहिती जाणून घेणे.

९) भास्कराचार्यांच्या निसर्ग केंद्राचे वैशिष्ट्य जाणून घेणे.

१०) पर्यटन स्थळ म्हणून हे स्थान नावारूपाला कसे आले जाणून घेणे.

FOR EDUCATIONAL USE




Routemap - Google Photo

# नियोजन

बी.ए. च्या प्रथम वर्षासाठी आम्ही क्षेत्रभेट द्यायचे ठरवायचे होते. क्षेत्रभेटीमुळे आपल्याला क्षेत्रभेट कशी द्यावी हे देखील समजले. सर्व प्राध्यपकांच्या मदतीने १८ ऑगस्ट -ला सर्वांना विचारले की क्षेत्रभेटीसाठी ठिकाण सुचवा त्या -नंतर दोन ठिकाणी अतिशय जवळ व क्षेत्रभेटीसाठी योग्य हो -ते ते म्हणजे ऋषीपांथा आणि पारणादेवी थोड्या वर्गातील चर्चा नंतर पारणादेवी हे स्थान सर्वांनी निश्चित केले. १९ ऑगस्टला आमच्या क्षेत्रभेटीचे नियोजन प्रमुख विद्यार्थी विकी वाघळे हे पारणादेवी येथे गेले व क्षेत्रभेटीची परवान -गी घेतली तेथील अधिकाऱ्यांना भेटले त्यांना विचारुन आम्ही कळवतो असे सांगितले. त्यानंतर तेथे दिवसभर क्षेत्रभेट देणार असल्यामुळे जेवणाची व्यवस्था करणे गरजेचे होते. २२ ऑगस्टला नियोजन प्रमुखाने बऱ्याच ठिकाणी यांची विचारपूस केली. नंतर त्यातील दोन - तीन आचाऱ्यांचे जेवण व्यवस्थीत होते. व आम्हा विद्यार्थ्यांच्या खिशाला परवडणारे देखील होते त्यातील गणेश मंडळ कार्यालयाचे आचारी प्रविण पवार यांना आम्ही जेवणाची व्यवस्था करण्याचे सांगितले त्यात आम्ही त्यांना मसाले भात, खोबऱ्याची बर्फी, मटरपनीरची भाजी, पापड, पुरी, कोशींबीर, पाणी, पत्रावळ्या, ग्लास असे सर्व बनवण्यास व दोन वाजेच्या सुमारास आणण्यास सांगितले.

२३ आगस्टला आम्ही किती पैसे प्रत्येक विद्या -र्थ्याला लागतील ते काढले त्या पूर्वी आम्ही गाडी भाड्या -च्या देखील प्रमुखाने विचारणा केली. प्राध्यपकांना सर्व पैशांचे नियोजन सांगितले. दुसऱ्या दिवशी वर्गात प्राध्यपकांनी प्रत्येक

FOR EDUCATIONAL USE

विद्यार्थ्यांला लागणारे पैसे जमा करण्यास सांगितले. क्षेत्रभेटीच्या प्रमुखाकडे सर्वांनी पैसे जमा करावयाचे व त्यानंतर आपल्या नावापुढे सही करायची असे सांगण्यात आले. (सूचना दिली) २४ ऑगस्टला प्रथम वन अधिकाऱ्यांची परवानगी घेण्यासाठी गेले. तेथील वनअधिकारी देसाई साहेबांनी आम्हांला लेखी स्वरूपात परवानगी दिली नाही त्यांनी फक्त तोंडी सांगितले, की क्षेत्रभेट देवू शकतात.

२६ ऑगस्ट पर्यंत सर्व विद्यार्थ्यांचे पैसे जमा झाले होते. काही विद्यार्थी उपस्थित नसल्याने त्यांना दुसऱ्या दिवशी जमा करण्यास सांगितले मुदत वाढवून दिली जवळ जवळ जेवणासाठी ५००० रु. व गाडी भाडे ६०००रु असे त्यानुन दिले. २५० रु. प्रत्येक विद्यार्थ्याकडून घेतले होते.

आम्ही सर्वांनी २९ ऑगस्टला दिवस निश्चित केला. व क्षेत्रभेटी साठी २८ ऑगस्टला प्राध्यापकांनी सूचना सर्व विद्यार्थ्यांना दिल्या दुसऱ्या दिवशी सर्वजण आम्ही क्षेत्रभेटीसाठी गेलो.

FOR EDUCATIONAL USE

# अंमलबजावणी

## प्राकृतिक वैशिष्ट्ये

## -।- नदी -।-

डोंगरी नदी ही पाटणादेवींच्या मंदीरापासून दक्षिणेस २० ते ३० कि.मी. अंतरावर मोठ्या महादेवाच्या मंदिराच्या डोंगरातून त्या नदीचा उगम झाला आहे. ही नदी पाटणादेवींच्या मंदिरा समोरून चाळीसगावच्या दिशेने वाहते. त्या नदीच्या काठी चंडीका मातेचे मंदिर वसलेले आहे. या नदीचे खोरे पाटणादेवींच्या मंदिराच्या पश्चिमेस आहे.

## * नदीचे वैशिष्ट्ये :-

१) लांब नदी :- डोंगरी नदी ही मोठ्या महादेवाच्या मंदिरापासून तिचा उगम झाला आहे. ही नदी ३० ते ४० किमी लांबीची आहे. त्या नदीची लांबी पाटणादेवी पासून चाळीसगाव पर्यंत दिसून येते आणि तितुर नदीला जाऊन मिळते.

२) नदीचा विस्तार :- डोंगरी नदीचा विस्तार हा २०० ते ३०० आहे. त्या नदीच्या पात्रात वेगवेगळ्या आकाराचे दगड आढळतात. नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूला मोठे-मोठे झाडे आहेत.

३) भाविकांसाठी नदीचा उपयोग :- चंडिका मातेचे दर्शन घेण्यासाठी येणारे भाविक हे या नदीच्या पात्रात अंघोळ करतात. व येणारे भाविक व येथील निवासी वेगवेगळ्या गोष्टींसाठी पाण्याचा वापर करतांना दिसून आले आहेत.

FOR EDUCATIONAL USE

# धबधबा

चाळीसगाव पासून १८ कि.मी अंतरावर पश्चिमेस पाटणादेवी हे मंदिर स्थापित आहे. आणि त्या मंदिराच्या मागे पाठीमागे १ किमी अंतरावर धवलतीर्थ हा धबधबा वसलेला आहे. मंदीरापासून आपण १० ते १५ मिनिटात त्या धबधब्या जवळ पोहचतो निसर्गाने आपली शक्ती प्रकट करुन त्या धबधब्याचे सौंदर्य वाढवले आहे.



# वनस्पती सृष्टी - प्रकार वैशिष्ट्ये -

पारणादेवी या जंगलात वेगवेगळ्या प्रकारचे वनस्पती आम्हांला दिसून आले. जवळ जवळ ८०० प्रकारच्या वेगवेगळ्या औषधी वनस्पती तेथे आढळून येता असे म्हटले जाते. आम्ही पाहिलेल्या वनस्पती व त्यांची वैशिष्ट्ये -

१) कडु लिंब :- आम्हाला खूप कडु लिंबाचे झाड दिसले आणि ते फार मोठ-मोठे होते. त्यांची उंची सर्वसाधारणपणे ३० ते ६० फुट उंच दिसली. हे वृक्ष घनदाट अशी छाया देतात. ९ ते १५ इंच लांब देठ दिसून आले. सर्व झाडे सम अंतरावर लावलेली दिसून आली सर्व झाडे हिरवीगार दिसत होते. या झाडांची सावली दाट असल्यामुळे अनेकजणा तेथेच जेवायला बसलेली दिसली.

या झाडाच्या लाकडाचा उपयोग इमारती व टेबल - खुर्ची ह्यासारख्या वस्तु बनवण्यासाठी होतो.

२) औदुंबर :-

आम्हांला उंबरच्या झाडाची खुप झाडे दिसली. या झाडाची खोड पांढरा दिसून आले. पाने हिरवी गारची होते. झाडांची उंची सर्वसाधारणपणे ५० ते ५० फुट दिसली जी पाने कोवळी होती ती हिरवी दिसली व जी पाने पिकलेली होती ती लाल रंगाची दिसत आली. आम्हांला या झाडावर मधमाशांचे पोळे दिसले. या झाडामुळे पाण्याचा साठा जास्त प्रमाणात होतो.

FOR EDUCATIONAL USE

३) सागः-

या जंगलामध्ये आम्हांला सागाची झाडे दिसून आली. सागवान ४० मीटर फुट उंच आणि हिरव्या पानांची होती या झाडाचे खोड पिवळसर दिसून आले. या झाडाचे फुल लहान दिसून आले.

या झाडाचे लाकुड अगदी मजबूत असतात. त्यामुळे झाडाच्या लाकडापासून तयार केलेली वस्तू टिकावू असतात.

FOR EDUCATIONAL USE

# -:- पुरातन वास्तू -:-

पाटोदेवी परिसरात अनेक पुरातन वास्तु आहेत. या परिसराला पौराणिक इतिहास लाभला आहे. अनेक ताम्रपत्रांवर या पुरातन वास्तुंचा उल्लेख आढळतो.
या परिसरातील पुरातन वस्तु पुढीलप्रमाणे :-


1) हेमाडपंथी महादेव मंदीर :- सदर मंदिर हे यादवकालीन काळात बांधले आहे. हेमाद्री पंडीत यांनी या मंदिराची स्थापना केली आहे. या मंदिरात शिवलिंग, कासव आणि नंदी यांची मूर्ती आहे श्रावण महिन्यात या मंदिरात जत्रा भरते.

2) चंद्रिका माता मंदिर :- या मंदिरात 12 हात असलेली चंद्रिकामाता यांची मूर्ती 12व्या शतकात स्थापना केलेली आहे या मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला जातो.

3) गायमुख ठिकाण :- डोंगरातुन खाली येणारी पाणी गायीच्या मुखातुन बाहेर पडते. तो हे स्थान या स्थानात 12 हि महिने पाऊस पडतो अशी धारणा आहे.

4) चंडिकामाता मंदिर :- हे चंडिकामाता या चंद्रिकामाता यांच्या बहिण आहेत. या मंदिराची ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाही.

FOR EDUCATIONAL USE



# d) हवामान

पाटणादेवी हे ठिकाण महाराष्ट्रात जळगाव जिल्हातील चाळीसगांव पासून नैऋत्येस १८.०० किमी अंतरावर असलेल्या जागेत आदिवासींनी चंडिकादेवीचे पुरातन मंदिर आहे. मंदिर सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी उंच चौथाऱ्यावर धवल तिर्थापासून उगम पावलेल्या डोंगरी नदी किनारी आहे. आम्ही जेव्हा या मंदिराजवळ गेलो. तेव्हा परिसर अतिशय नयनरम्य आणि मनमोहक आहे. निसर्ग सौंदर्याने बहरलेला आहे. तिथे गेल्यावर वातावरणामुळे मन प्रसन्न झाले. तिन्ही बाजूने अर्धचन्द्राकार सह्याद्री पर्वताचे उंचकडे, विविध वृक्ष, सुंदर फुले आपले मनमोहक घेतात विशेषत: पावसाळ्यात ऑगस्ट सप्टेंबरमध्ये येथील हवामानात गारवा जाणवला, मनाला प्रसन्नता देणारे शांत व अल्हाददायक वातावरणात असते. ह्या दिवसात मंदिरात व मंदिराच्या चौथाऱ्यापासून भोवतालचा परिसर व नदीही नटलेला दिसला. रंगीबेरंगी फुलांनी बहरलेला होता. येथे अनेक प्रकारचे धबधबे आपल्याला पहायला मिळाले.

पाटणादेवी येथे पर्जन्याचे प्रमाण जास्त असल्याने वातावरणातील हवा थंड जाणवली. उन्हाळ्यात देखील परिसरात झाडझुडपे असल्याने गारवा जाणवले. डोंगराळ भागातील पावसाच्या प्रमाणामुळे तेथे अनेक नवनवीन झरे निर्माण झाले आहेत. मनाला आनंद देणारी झुळझुळ हवा व सुखद हवेचा स्पर्श जाणवत होता. आम्ही पावसाळ्यात गेल्यामुळे आम्हाला नदीचे वातावरणातून प्रसन्नता मिळाली. असे वातावरण, हवामान पाटणादेवीचे आम्हाला पहावयास मिळाले.

FOR EDUCATIONAL USE

# d) हवामान

पाटणादेवी हे ठिकाण महाराष्ट्रात जळगाव जिल्हातील चाळीसगांव पासून नैऋत्येस १८०० किमी अंतरावर असलेल्या जागृत आदिशक्ती चंडिकादेवीचे पुरातन मंदिर आहे. मंदिर सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी उंच चौथाऱ्यावर धवल तिर्थापासून उगम पावलेल्या डोंगरी नदी किनारी आहे. आम्ही जेव्हा या मंदिराजवळ गेलो. तेव्हा परिसर अतिशय नयनरम्य आणि मनमोहक आहे. निसर्ग सौंदर्याने बहरलेला आहे. तिथे गेल्यावर वातावरणामुळे मन प्रसन्न झाले. तिन्ही बाजूने अर्धचन्द्राकार सह्याद्री पर्वताचे उंचकडे, विविध वृक्ष, सुंदर फुले आपले मनमोहक येतात विशेषतः पावसाळ्यात आगस्ट सप्टेंबरमध्ये येथील हवामानात गारवा जाणवला, मनाला प्रसन्नता देणारे शांत व अल्हाददायक वातावरणात असते. ह्या दिवसात मंदिरात व मंदिराच्या चौथाऱ्यापासून भोवतालचा परिसर व तरुने नटलेला दिसला. रंगीबेरंगी फुलांनी बहरलेला होता. येथे अनेक प्रकारचे धबधबे आपल्याला पहायला मिळाले.

पाटणादेवी येथे पर्जन्याचे प्रमाण जास्त असल्याने वातावरणातील हवा थंड जाणवली. उन्हाळ्यात देखील परिसरात आडझुडपे असल्याने गारवा जाणवले. डोंगराळ भागातील पावसाच्या प्रमाणामुळे तेथे अनेक नवनवीन झरे निर्माण झाले आहेत. मनाला आनंद देणारी झुळझुळ हवा व सुखद हवेचा स्पर्श जाणवत होता. आम्ही पावसाळ्यात गेल्यामुळे आम्हाला नदीचे वातावरणातून प्रसन्नता मिळाली. असे वातावरण, हवामान पाटणादेवीचे आम्हाला पहावयास मिळाले.

FOR EDUCATIONAL USE

# मृदा

आपल्या कहान्या विविध परिसंस्थामध्ये असंख्या मृदा आहेत. मातीचे प्रकार हे हवामान वनस्पती पर्जन्यमापन बारा, यासारख्या पर्यावरणीय परिस्थितीवर अवलंबून असते. आणि माती तयार करणारे पाच घटक हवामान, मूक खडक, आराम, वेळ आणि त्यात राहणारे जीव हे माती तयार करणारे पाच घटक आहे.

मातीचे प्रकार ⇒
- रेगुर मृदा
- तांबडी मृदा
- काळी मृदा

मातीचे आपल्याला विविध प्रकार पहावयास मिळतात. माती ही पृथ्वीच्या बचे प्रमाण आहे. तसेच ही एक घन, वायू, व पाणी (तरल पदार्थ) धरून ठेवण्याची एक त्रिस्तरीय प्रणाली समजल्या जाते.

आम्ही पाटणादेवी येथे क्षेत्रभेटीला गेलो तेव्हा आम्हाला तेथील मातीचे विविध प्रकार दिसले त्यातील प्रकार खालील प्रमाणे :-

1) रेगुर मृदा :- रेगुर मृदा ही जास्त प्रमाणात आढळली. रेगुर कसदार मृदा ही अग्नीजन्य खडकापासून बनवलेली आहे. रेगुर मृदात पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता सर्वाधिक असते. या मृदात चुनखडी (चुना), पोटॅश, लोह हे द्रव्ये जास्त प्रमाणात असते. या मृदेत कापूस, मका, ऊस, भुईमूग हे पीक जास्त प्रमाणात येतात. आम्हांला ही या रेगुर मृदेची वैशिष्ट्ये तेथे आढळून आली.

FOR EDUCATIONAL USE

2) तांबडी मृदा :- तांबडी मृदा फारशी सुपीक नसते, त्यामुळे तीचा उपयोग जास्त सागाची झाडे, तांदुळ या पीक व झाडासाठी होतो. आम्हांला पाटणादेवी येथे जास्त प्रमाणात सागाची झाडे दिसून आली अर्थातच तेथील मृदा तांबडी असल्याचे लक्षात आले.

3) भुरमाड मृदा :- आम्हांला पाटणादेवी या पर्यटन स्थळांमध्ये भुरमाड मृदा पण दिसली त्या मातीला पटकन पाणी लागते. ती लगेच कोरडी होते. ती जास्त वेळ पाणी धरत नाही. त्या मातीत मुख्यत्वे डाळींब, पपई ही पिके घेतली जातात. आम्हांला थोड्या प्रमाणात ही माती पाटणादेवी या क्षेत्रात आढळून आली.

FOR EDUCATIONAL USE

# -¦- प्राणी संपदा -¦-

चाळीसगांव शहराच्या १८ कि.मी. अंतरावर नैऋत्येला पाटणादेवीचा हिरवा शालू परिधान केलेला निसर्गरम्य परिसर आहे. येथे दाटवृक्षराजी सोबतच दुर्मिळ वनस्पती आहे. जंगल परिसराला सातमाळा डोंगररांगांची नैसर्गिक तटबंदी आहे. याच डोंगररांगामधून उगम पावत येणारे लहान-मोठे शुभ्र धवल धबधबे पावसाळ्यात त्यांच्या सौंदर्याला चार चाँद लावतात. त्यामुळे आम्हाला त्याठिकाणी माकडांची संख्या जास्त प्रमाणात आढळली.

पाटणादेवी जंगल परिसरात प्राण्यांना वावरण्यास मुक्त वाव मिळते. एकूण सहा हजार पन्नास हेक्टर जंगल परिसरात मोठ्या संख्येने प्राणी संपदा आहे. दुर्मिळ पक्ष्यांचा अधिवास आणि वनसंपदेमुळे येथे वर्षभर पर्यटकांची गर्दी होत असते. आम्ही तीथे बघितले की, वन्यपशुंना कोणता-ही संसर्ग होऊ नये त्यासाठी खबरदारी घेण्यात येते.

पाटणादेवी जंगल परिसराला जोडूनच गौताळा अभयारण्याचा परिसर आहे. पाटणादेवीच्या जंगलात वन्य प्राण्यांसा-ठी मोठ्या प्रमाणावर अन्नसाखळी उपलब्ध असून उन्हाळ्यात ११ कृत्रिम पाणवठे तयार केले असे सांगितले. पाटणादेवी जंगलात साधारण ११ बिबटे असल्याचे नोंद प्राणी गणनेत बघितली. याबरोबर नीलगाय, मोर, हरीण, माकडे ही वेडून अधिक, रानडुकर, विविध पक्षी आढळतात. व त्या प्राण्यांमधून काही प्राणी स्वतः बघितले.

# :- पर्यटन स्थळ म्हणून त्या स्थानाचे महत्त्व :-

पर्यटन स्थळ म्हणून पाटणादेवी हे एक आनंद घेण्याचे ठिकाण आहे. जे पर्यटकांना आकर्षित करते कस्म-शुरू करण्याचे ठिकाण आहे.

पाटणादेवीच्या आनंदाची प्रवास सुरू होतो. गौताळ ~~औंम~~ औटमघाट अभायारण्याच्या भव्य प्रवेश द्वारापासून, सह्याद्री पर्वतांच्या रांगा, लहान/मोठे झरे, धबधबा मनाला वेधून घेतात. दाट झाडीतून अरुंद वाटेवरून चालतांना आपण कोकणात आल्याचा भास होतो. धवलतीर्थापासून उगम पावलेल्या डोंगरी नदीच्या किनारी उंचावर वसलेले ठिकाण म्हणजे पाटणादेवी तीर्थक्षेत्र आहे. खळाळत्या डोंगरी नदीवरील छोटासा साकव ओलांडून पुढे गेल्यावर समोरच देवी चंडिकेचे, हेमाडपंथी भव्य मंदीर आणि पाठीशी उभा असलेला प्रचंड मोठा डोंगर दृष्टिस आहे. संपूर्णपणे काळ्या पाषाणात बांधल्या गेलेल्या हेमाडपंथी मंदिराच्या प्रवेशव्दार दोन भल्या मोठ्या दीपमाळा दिसून येतात. पाटणादेवी या तीर्थक्षेत्री उंच चौथऱ्यावर वसलेल्या या मंदिराची रचना पुर्वाभिमुख आहे. इ. स. ११२८ च्या कालखंडात निर्माण केलेले हे देवस्थान वास्तुकलेचे पाटणादेवी पर्यटन स्थळाच्या आनंद घेता येतो आणि संस्कृतीची माहिती मिळते.

# महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चाळीसगांव

## बी. एड प्रथम वर्ष २०२१-२०२२

## EPC-4 Environmental Studies

प्रात्यक्षिकाचे नांव :- Visit to forest and prepare the document on environmental assets.

# प्रात्यक्षिकासाठी प्रश्नावली

१. पाटणा देवी परिसरात जे जंगल आहे त्याचा विस्तार किती कि.मी.आहे?

२. ह्या जंगलसंपत्तीचे मुख्य वैशिष्ट्ये कोणती सांगता येतील?

३. जंगलात कोणत्या प्रकारच्या वनस्पती आहेत? व त्यांना कोणते अनुकूल हवामान लागते?

४. ह्या जंगलात प्रसिद्ध पाटणादेवीचे मंदिर आहे. त्या विषयीची आख्यायिका कोणती?

५. ह्या जंगलात कोण कोणत्या लेण्या आहेत?

६. येथे कोणता धबधबा आढळतो?

७. या जंगलाच्या बाजूला कोणते अभयारण्य आढळते?

८. भास्कराचार्य निसर्ग केंद्राचे वैशिष्ट्ये कोणते?

९. ह्या जंगलातील प्राण्याचे पक्ष्यांचे व जंगलसंपत्तीचे संरक्षण कशाप्रकारे केले जाते?

१०. शासनाकडून जंगलसंपदेच्या संरक्षणासाठी कोणत्या योजना राबविल्या जात आहे?

११. ह्या जंगलाला भेट देण्यासाठी अनेक पर्यटक येतात त्यांचा जंगलसंपदेच्या संरक्षणासाठी कितपत फायदा होतो?

१२. 'पर्यटन स्थळ' म्हणून हे स्थान नावारुपाला येत आहे पण पर्यटकांमुळे पर्यावरणीय दृष्ट्या काही समस्या येथे जाणवतात का?

१३. पर्यटकांमुळे ज्या समस्या निर्माण होतात त्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात?

१४. जंगल परिसर असल्यामुळे येथे पर्यटकांच्या जीविताचे रक्षण हिंस्र प्राण्यांकडून कसे केले जाते?

१५. हे स्थान पर्यटकांना कोणता संदेश देतो?

# उत्तर सूची

१) पाटणादेवी परिसरातील जंगलाचा विस्तार २६ हेक्टरचा आहे।

२) त्या जंगलसंपत्तीचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे येथे आढळू -न येणारी औषधी वनस्पती येथील मृदा अतिशय सुपी -क आढळून आली। नदीचे पाणी अतिशय स्वच्छ होते। शुद्ध हवेचे प्रमाण देखील जास्त होते।

३) जंगलात जवळपास ८०० औषधी वनस्पती आहेत। चंदना -चे झाड, चिंचेचे झाड, आंब्याचे झाड, सागाचे झाड सिताफळाचे झाड, कडुलिंब, आवळ्याचे झाड, झाडांना थंड व भरपूर पाणी आवश्यक असते. तसेच उन्हाचे प्रमाण देखील मुबलक होते।

४) त्या जंगलात प्रसिद्ध पाटणादेवी मंदिर आहे त्या विष -यी शके ११५० (इ॰ स॰ १२२८) मध्ये आषाढी आमावस्येला सुरुवात होते। त्या दिवशी वितराच्या स्मृती प्रीत्यर्थ यादवराव खेळण चंद्र व गोविंदराज मौर्य यांनी हे मंदिर लोकांसाठी खुले केले शंतर शंकराने आपले तिसरे नेत्र उघडल्याने हाहाकार माजला होता त्यावेळी भगवान विष्णूनी शंकराच्या क्रोधाला शांत करण्यासाठी सुदर्शनचक्र सोडून सती पार्वतीच्या शवाचे १०८ तुकडे केले। पाटणा येथील डोंगरावर पार्वतीच्या उजव्या हाताचा पंजा तुटून पडला म्हणून या ठिकाणी वर दक्ष शक्तीपीठाची निर्मिती झाली अशी आख्यायिका सांगितली जाते।

FOR EDUCATIONAL USE

५) ह्या जंगलात पितळखोरे व सिताराणी लेणी आहेत।

६) ह्या जंगलात धवलतीर्थ धबधबा, केदारेश्वर धबधबा दिसून आला।

७) या जंगलाच्या बाजूने गौताळा औटमघाट अभयारण्य आहे।

८) भास्कराचार्य यांच्या नातू चांगदेव याने सुद्धा अध्ययनाची सुरुवात याच मठातून केली। तसेच लीलावती नाम- क देखील ग्रंथ देखील येथे शिलालेखावर आढळून आला आहे ही वैशिष्ट्ये पहावयास मिळाली।

९) ह्या जंगलातील प्राण्यांचे, पक्ष्यांचे व जंगलसंपत्तीचे संरक्षण करण्यासाठी, झाडांची कत्तल न करणे तसेच नवीन झाडे लावली जातात। कचरा इतरत्र न फेकता कचराकुंडीत टाकला जातो। अशाप्रकारे मंदिर व मंदिर परिसराचे संरक्षण केले जाते।

१०) शासनाकडून जंगलसंपदेच्या संरक्षणासाठी "झाडे लावा, पर्यावरण वाचवा, जीव जीवस्य जीवनम, राज्यात प्राणी संरक्षण कायदा, गो - गोवंश हत्या, तस्करी रोखणे इत्यादी उपक्रम राबवण्यात आले आहे।

११) ह्या जंगलात भेट देण्यासाठी अनेक पर्यटक येतात। त्यांचा जंगलसंपदेच्या संरक्षणासाठी काही प्रमाणातच फायदा होतो। काही पर्यटक याचे महत्त्व न जाणता हानी पोहच- वताना दिसून येत आले।

१२) पर्यटन स्थळ म्हणून जरी हे स्थान नावारुपाला येत असले तरी पर्यटकांमुळे येथे अनेक समस्या दिसून येतात. पर्यटक कचरा कचराकुंडीत न टाकता इतस्त्र फेकता तसेच पुजेचे साहित्य नदी पात्रात टाकता त्यामुळे पाणी दुषित होणे इ. समस्या जाणवल्या.

१३) पर्यटकांमुळे ज्या समस्या निर्माण होता त्या सोडवण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या :-

i) जागोजागी सुचनाफलके लावण्यात आली.

ii) पुजेचे साहित्य मंदिरात आणण्यास तसेच नदीच्या पात्रात न टाकण्यास सक्ती केली.

iii) त्याचप्रमाणे विक्रिचे प्रमाणदेखील कमी केले.

iv) कचराकुंड्यांची व्यवस्था केली.

१४) जंगल परिसर असल्यामुळे येथे पर्यटकांच्या जीविताचे रक्षण हिंस्र प्राण्याकडून होणे महत्वाचे आहे. त्यासाठी पर्यटकांना जंगलाच्या खोलात जाण्यास मनाई आहे सुचनाफलक तसेच ठिकठिकाणी कर्मचारी उपस्थीत असतात.

१५) ह्या पर्यटन स्थानातुन, जंगलाला आपण किती महत्वाचे समजावे तसेच शांतता व प्रसन्नता कशाप्रकारे आपल्याला मिळते. जसे आपण निसर्गाला जपु. तसेच निसर्ग आपल्याला जपेल हा संदेश मिळतो.

१२) पर्यटन स्थळ म्हणून जरी हे स्थान नावरुपाला येत असले तरी पर्यटकांमुळे येथे अनेक समस्या दिसून येतात. पर्यटक कचरा कचराकुंडीत न टाकता इतस्त्र फेकतात तसेच पुजेचे साहित्य नदी पात्रात टाकतात त्यामुळे पाणी दुषित होणे इ. समस्या जाणवल्या.

१३) पर्यटकांमुळे ज्या समस्या निर्माण होतात त्या सोडवण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या :-
i) जागोजागी सुचनाफलके लावण्यात आली.

ii) पुजेचे साहित्य मंदिरात आणण्यास तसेच नदीच्या पात्रात न टाकण्यास सक्ती केली.

iii) त्याचप्रकारे विक्रीचे प्रमाणदेखील कमी केले.

iv) कचराकुंड्यांची व्यवस्था केली.

१४) जंगल परिसर असल्यामुळे येथे पर्यटकांच्या जीविताचे रक्षण हिंस्र प्राण्याकडून होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी पर्यटकाना जंगलाच्या खोलात जाण्यास मनाई आहे सुचनाफलक तसेच ठिकठिकाणी कर्मचारी उपस्थीत असतात.

१५) ह्या पर्यटन स्थानातून, जंगलाला आपण किती महत्त्वाचे समजावे तसेच शांतता व प्रसन्नता कशाप्रकारे आपल्याला मिळते. जसे आपण निसर्गाला जपू तसेच निसर्ग आपल्याला जपेल हा संदेश मिळतो.

FOR EDUCATIONAL USE

१२) पर्यटन स्थळ म्हणून जरी हे स्थान नावारूपाला येत असले तरी पर्यटकांमुळे येथे अनेक समस्या दिसून येतात. पर्यटक कचरा कचराकुंडीत न टाकता इतरत्र फेकतात तसेच पुजेचे साहित्य नदी पात्रात टाकतात त्यामुळे पाणी दूषित होणे इ. समस्या जाणवल्या.

१३) पर्यटकांमुळे ज्या समस्या निर्माण होतात त्या सोडवण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या :-

i) जागोजागी सूचनाफलक लावण्यात आली.

ii) पुजेचे साहित्य मंदिरात आणण्यास तसेच नदीच्या पात्रात न टाकण्यास सक्ती केली.

iii) त्याचप्रमाणे विक्रीचे प्रमाणदेखील कमी केले.

iv) कचराकुंड्यांची व्यवस्था केली.

१४) जंगल परिसर असल्यामुळे येथे पर्यटकांच्या जीविताचे रक्षण हिंस्र प्राण्याकडून होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी पर्यटकांना जंगलाच्या खोलात जाण्यास मनाई आहे सूचनाफलक तसेच ठिकठिकाणी कर्मचारी उपस्थित असतात.

१५) या पर्यटन स्थानातून, जंगलाला आपण किती महत्त्वाचे समजावे तसेच शांतता व प्रसन्नता कशाप्रकारे आपल्याला मिळते. जसे आपण निसर्गाला जपू. तसेच निसर्ग आपल्याला जपेल हा संदेश मिळतो.

# पर्यावरण समस्या

१) पाटणादेवी आवारात तसेच मंदिर व नदीच्या आव-रातील कचरा :- आम्ही सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षिका पाटणादेवी आवारात पर्यावरणाचे तसेच नदीचे निरिक्षण करित असतांना आम्हांला कचरा बऱ्याच प्रमाणात आढळतात.

२) पाटणादेवी आवारात व नदी काठावरील प्लास्टिक सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षिका पर्यावरणाबद्दल माहिती जाणून घेत होत असतांना तसेच नदी पार करित असतांना बऱ्याच प्रमाणात प्लास्टिक दिसून आले.

३) पाटणादेवी येथे मार्गदर्शकांची समस्या -
शैक्षणिक सहल गेली असता पाटणादेवी येथे आम्हांस सर्व विद्यार्थी शिक्षक - शिक्षिकांनी मार्गदर्शकाची कमतरता जाणवली.

४) आर्यभट यांच्या संग्रहालयाची समस्या -
आम्ही सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षिका यांनी आर्यभट यांच्या संग्रहालयाला भेट देण्याचे ठरविले असता तेथील सुरक्षा रक्षकांनी आम्हांस सांगण्यात आले की संग्रहा-लयाची तोड फोड झाली आहे. जाऊ दिले नाही कारण

पर्यावरणीय समस्या व त्यावरील
७) उपाययोजना

१) पाटणादेवी या वर पाटणादेवी ट्रस्ट ने तसेच वन अधिकारी यांनी पुलाकडे दुर्लक्ष न करता राज्य सरकारला लवकरात लवकर पुलाची समस्या सांगून चांगला उंच पुल बांधण्याची उपयायोजना करावी.

२) पाटणादेवी मंदिराच्या आवारात कचरा फेकणाऱ्या दंडात्मक कार्यवाही तसेच कचऱ्या मुळे पर्यावरण कसे दुषित होणे यांची समज द्यावी.

३) पाटणादेवी आवारात प्लास्टिक व नदी काठावर प्लास्टिक फेकणाऱ्यास दंडात्मक कार्यवाही तसेच प्लास्टिक हे वन्य प्राण्यांच्या पोटात गेल्यास त्यांची जीवितहानी होवू शकते हे समजून सांगणे.

४) आर्यभट यांच्या संग्रहालयाची समस्या हि वनअधिकाऱ्याने सरकारला या बद्दल माहिती देवून तात्काळ संग्रहालय दुरूस्तीची मागणी करावी.

५) सरकार तर्फे किंवा पाटना गावातील स्थानिक गार असे मार्गदर्शक या ठिकाणी नेमावे जेणे करून पाटणादेवी बद्दल संपूर्ण मार्गदर्शन पर्यटकांना देता येईल.

FOR EDUCATIONAL USE

७) क्षेत्रभेटीच्या ठिकाणावरील काही माहितीगार लोकांकडून किल्यांची माहिती जाणून घेतली.

८) पाटणादेवी इथे केदार धबधबा आणि धवलतीर्थ धबधबा असे दोन धबधबे आहेत पण त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश लागू केले असल्याने ते जवळून बघता आले नाही व निरिक्षण करून माहिती मिळवता आली नाही म्हणून हे उद्दिष्ट ~~करून~~ साध्य झाले नाही.

९) भास्कराचार्यांच्या निसर्ग केंद्राला भेट देण्यास गेलो असता काही कारणास्तव ते बंद केले होते म्हणून तेथील माहिती आम्हाला मिळाली नाही आणि आमचे हे उद्दिष्ट्य साध्य झाले नाही.

१०) पाटणा देवीला डोंगर, दोन मंदिर जंगल व जंगलातील प्राणी तेथे पाहण्यास मिळते. ह्या गोष्टी लोकांना आकर्षित करतात. पाटणा देवी हे नावा रूपाला खुप चांगले आहे म्हणून ते आता पर्यटन स्थळ बनले आहे. आम्हाला हे निरिक्षणातून दिसून आहे.

## * क्षेत्रभेटीचे शैक्षणिक उपयोजन :-

१) क्षेत्रभेटीद्वारे विविध पर्यटन स्थळांची माहिती ही आपणास मिळत असते.

२) क्षेत्रभेटीमुळे विविध घटकांचा, प्रक्रियांचा प्रत्यक्ष अनुभव हा घेता येत असतो.

३) क्षेत्रभेटीद्वारे मानवाला, विद्यार्थ्यांना वेगळ्याच गोष्टी-चा/ विविध पर्यटन स्थळांची, व पर्यावरणीय समस्या जाणून घेता येत असते.

४) क्षेत्रभेटीद्वारे क्षेत्रभेटीसाठी निवडलेल्या क्षेत्रांमधील सामाजिक, आर्थिक व ऐतिहास आणि सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करता येतो.

५) अभ्यासलेल्या ज्ञानाच्या उपयोजनाच्या चालना मिळते.

FOR EDUCATIONAL USE

# -¦- समारोप -¦-

विद्यापीठांतर्गत कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या विषयात "EPC-4 Environmental studies" या विषयाचे प्रात्याक्षिक करण्यासाठी आम्ही पाटणादेवी जंगलात गेलो होतो.

व या प्रात्याक्षिकासाठी आमच्या कॉलेजच्या सर्व प्राध्यपकांनी आम्हांला मदत केली. पाटणादेवीला जाऊन आम्ही पुरातन वास्तु, नदी, पाटणादेवीचे मंदीर, नैसर्गिक साधनसंपत्ती, भास्कराचार्य आनि शीरुह यांचा अभ्यास केला. आणि हा अहवाल प्रदर्शित केला.

या प्रात्याक्षिकामुळे जंगल सफारीचे दर्शन घडून आले आणि मन प्रफुल्ल आले. या सफरित आम्ही खुप मजा केली.

भविष्यात या प्रात्याक्षिकामुळे आम्हांला नक्कीच फायदा होईल.

FOR EDUCATIONAL USE

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, बी.एड. प्रथम वर्ष 2021-22 वर्षाची विद्यार्थी म महाजन जयश्री राजेंद्र यांनी शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील पेपर EPC-4 क्षेत्र भेट अहवाल या विषयांतर्गत प्रात्यक्षिक कार्य महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविदयालय, चाळीसगांव या अभ्यास केंद्रात विषय प्राध्यपकांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

करिता प्रमाणपत्र देत आहे.

ठिकाण - चाळीसगांव
दिनांक - 13/05/2022

Lpardeshi

विषय प्राध्यपकाचे नाव व सही.
प्रा. लता परदेशी मॅडम


REDMI NOTE 11S